**<u>रे.क.नं. ६/२०१८ नि.४५ खालील आदेश.</u>**

श्री.दत्तात्रय रामचंद्र शेटे
विरुध्द
श्री.भगवान तुकाराम शेटे

प्रस्तुत प्रकरणातील प्रतिवादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता कलम ६ नियम १७ प्रमाणे कैफियत दुरुस्तीसाठी दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादीचे असे कथानक आहे की, वादींनी प्रतिवादीविरुध्द दावा मिळकत खरेदीपत्र पुर्ण होवून मिळणेसाठी दावा दाखल केलेला आहे. सदर कामी प्रतिवादींनी कैफियतीमध्ये महत्वाचा मजकूर म्हणजे कैफियत कलम ५ नंतर **५-अ** मध्ये यातील *" वादी हे ब-याच वर्षापासून............ परंतु प्रस्तुत प्रतिवादींनी दि.१२.०७.२०२२ इ. रोजी पन्हाळा पोलिस स्टेशनमध्ये वादी व त्यांचे साथीदार यांच्याविरुध्द तक्रार दाखल केलेली आहे". तसेच* ***५-ब*** *मध्ये यातील वादींनी दाव्यामध्ये व तुर्तातुर्त मनाई अर्जामध्ये .................. वादींनी प्रतिवादी अडाणी असलेचा गैरफायदा घेवून खोटे व बनावट संचकारपत्र करुन वादीची मिळक्त हडप करणेचा हेतु आहे याही कारणावरुन दावा नामंजूर होणेस पात्र आहे"* असा मजकूर कैफियतीमध्ये नमुद करणे आवश्यक आहे. तसे न केल्यास प्रतिवादींचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. त्यामुळे प्रतिवादीने कैफियत दुरुस्तीची मागणी केली आहे.

३. वादीने प्रस्तुत अर्जास म्हणणे दाखल करुन अर्जास तीव्र विरोध केलेला आहे . वादीचे असे म्हणणे आहे की, वादीच्या पुराव्यासाठी तारीख नेमलेली असताना दाव्याची सुनावणी लांबवणीवर टाकणेचा एकमेव हेतु ठेवून प्रतिवादीने प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे. तसेच राजकीय बळाचा वापर करुन वादीवर दबाब टाकणेचा प्रतिवादींनी प्रयत्न केला होता. त्यामुळे प्रतिवादीने मागीतलेली प्रस्तावीत दुरुस्ती खोटी व चुकीची आहे. सबब अर्ज नामंजूर करणेत यावा अशी विनंती केली आहे.

४. वादीचा अर्ज, म्हणणे व अभिलेखावरील दोन्ही बाजुंची कथने तसेच कागदपत्रे यांचे अवलोकन केले व उभय वकिलांचा युक्तीवाद ऐकला.

५. सदरील अर्ज प्रतिवादीने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ प्रमाणे कैफियत दुरुस्तीकरिता केलेला आहे. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ प्रमाणे दाव्यातील पक्षकार त्यांची वाद कथने दाव्याच्या कोणत्याही स्तरावर दुरुस्त करु शकतात. जर पक्षकाराने अशा आशयाची दुरुस्ती संपरिक्षा सुरु होण्यापुर्वी मागीतली असेल तर ती दुरुस्ती न्यायालयाने मान्य करावी परंतू जर दुरुस्ती संपरिक्षा सुरु झाल्यानंतर मागीतली असेल तर संबंधीत पक्षकाराला अशी दुरुस्ती करणेकरिता का विलंब झाला याचे संयुक्तीक कारण द्यावे लागते व ते कारण न्यायालयास संयुक्तीक वाटल्यास न्यायालय दुरुस्ती अर्ज मंजूर करु शकते. प्रस्तुतचा दावा खरेदीपत्र पुर्ण होवून मिळणेसाठीचा आहे. प्रस्तुत दाव्यात मुद्दे निश्चीती झालेली आहे. वादीने सरतपासाचे शपथपत्र दाखल केलेले आहे परंतू त्यावर उलटतपास नोंदविणेत आलेला नाही. अशा परिस्थितीत दाव्याची संपरिक्षा सुरु झाली आहे असे म्हणता येत नाही. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ नुसार दावा दुरुस्ती संपरिक्षा पुर्व असेल तर न्यायालयाला तशी परवानगी द्यावी लागते. याठिकाणी हे नमुद करणे अत्यंत महत्वाचे आहे की, मा. सर्वोच्च व मा.उच्च न्यायालयाने असे वेळोवेळी दाखले दिले आहेत की, दावा दुरुस्तीची परवानगी देताना न्यायालयाने अति कठोर व तांत्रीक राहू नये. वादीचा दावा हा खरेदीपत्र पुर्ण होवून मिळणेकरिता असल्याने या कामी प्रतिवादी मागतात त्याप्रमाणे दुरुस्ती करणे अत्यावश्यक आहे. त्यामुळे प्रतिवादी यांनी प्रस्तुतचा दुरुस्तीचा अर्ज दाखल करुन सदरची दुरुस्ती कैफियत मध्ये होवून मिळावी अशी विनंती या अर्जाद्वारे केली आहे. त्यामुळे प्रतिवादीने मागितलेली दुरुस्ती दाव्याच्या या स्थितीत योग्य असलेचे दिसून येते. त्यामुळे वादीच्या दाव्यास कोणत्याही कायदेशिर बाबीची हरकत निर्माण होत नाही. अशाप्रकारे दुरुस्ती केलेस दाव्याचा गुणदोषावर निर्णय होणेस मदत होणार आहे. अशाप्रकारे दुरुस्ती मंजूर झाल्यास दाव्याचा गुणदोषावर अंतिम न्यायनिर्णय होणेस मदत होणार आहे.

६. याउलट अशाप्रकारे दुरुस्ती न केलेस दाव्यामध्ये गुंतागुंत निर्माण होण्याची शक्यता आहे. अशाप्रकारचे ज्यादा दावे निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे प्रतिवादीने मागितलेली कैफियत दुरुस्ती दाव्याचे गुणदोषावरील भवितव्यासाठी योग्य आहे. सबब अर्ज मंजूर करणे संयुक्तीक व न्यायोचीत आहे. याचवेळी वादींना झालेली गैरसोय देखील लक्षात घेतली पाहिजे. त्याकरिता प्रतिवादींचा प्रस्तुतचा अर्ज काही अंशी दंडावर मंजूर करणे आवश्यक आहे. सबब खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

०१. प्रतिवादीचा निशाणी ४५ चा अर्ज रक्कम रुपये २००/- (रक्कम रुपये दोनशेहे च्या )दंडावर मंजूर करणेत येत आहे.

०२. दंडाची रक्कम वादी यांना देवविणेत यावी.

०३. प्रतिवादीने कैफियत कलम ५ नंतर ५(अ), ५(ब )म्हणून ज्यादाचा मजकूर नमुद करुन चौदा दिवसाच्या आत तशी दुरुस्ती करुन दुरुस्त कैफियतची प्रत त्वरीत दाखल करावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by ATUL ASHOK KORE
Date: 2023.01.20 15:11:54 +0530

दिनांक १९.०१.२०२३.

अतुल अ.कोरे,
सह. दिवाणी न्यायाधीश क.स्तर, पन्हाळा.